**Knowledgeable Research (KR) 2026, Special Vol., (5):02**
**ISSN: 2583-6633, CODEN: KRABAU**
**International open-access peer-reviewed refereed monthly journal**
**https://knowledgeableresearch.com/index.php/1**

# कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि मराठी साहित्य : नवयुगातील संवाद

प्रा. डॉ.विठ्ठल जंबाले*
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर विभाग

**शोध सार**

*प्रस्तुत शोधनिबंधातून अभ्यासक या नात्याने मांडणी करीत असताना कथन केलेल्या बाबींचा संक्षिप्त गोषवारा खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे. 'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि मराठी साहित्य : नवयुगातील संवाद' या विषयाची उकल करताना कृत्रिम बुद्धिमत्ता - व्याख्या, स्वरूप, वैशिष्ट्ये या घटकांची मांडणी केली आहे. यामध्ये 'कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे साहित्यनिर्मितीला नवे आयाम प्राप्त झाले आहेत' हे कथन करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे साहित्य निर्मिती, आस्वाद, आकलन आणि विश्लेषण यासमोर आव्हाने निर्माण झाली आहेत, यांची सांगोपांग चर्चा केली आहे. मराठी साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेत मर्यादा आहेत. तसेंच लेखक- कवी- साहित्यिक सर्वच वाङ्मयप्रकार लीलया निर्माण करू शकत नाहीत. आणि निर्माण केले तर ते रटाळ होईल. प्रयत्न करणाऱ्या सगळ्यांचे सारखेच साहित्य दिसेल. पुनरावृत्ती अनुभवास नक्कीच येईल. परिणामतः रसिक वाचक दुरावतील, असा धोका संभवतो. कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून मराठी भाषेचे जतन, संवर्धन होईल. पण भाषेतील जीवंतपणा मानवी उपयोजनातच आहे. ते जीवंतपण कृत्रिम बुद्धिमत्ता देऊ शकणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारभूत मानून भविष्यात लेखकांची भूमिका बदलू शकते. संभाव्य सकारात्मक आणि नकारात्मक बदल घडू शकतात.*

**बीज शब्द:** *आर्टिफिशियल इंटेलिजन्स , संगणक विज्ञानाची एक उपशाखा आहे*

**Received: 02/12/2025**
**Accepted: 17/01/2026**
**Published: 31/01/2026**

***Corresponding Author:**
प्रा. डॉ.विठ्ठल जंबाले
**Email:** jvithalh@gmail.com

## प्रस्तावना :

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा (Artificial intelligance) प्रभाव पडला आहे, परिणाम जाणवत आहे. भविष्यातसुद्धा अशा प्रगतीशीलतेपासून मानवीय कोणतेच क्षेत्र अपवाद राहू शकत नाही. हे अंतिम सत्य आहे. मानवनिर्मित साहित्यक्षेत्रात एआयचा लीलया संचार होतच आहे. या अपरिहार्य परिस्थितीस मराठी साहित्य अपवाद नाहीच. अनेकांना प्रश्न पडतो की, साहित्यक्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता मित्र आहे की शत्रू ? याचे सरळपणे उत्तर देणे अवघड आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मराठी साहित्य यांचे परस्पर संबंध हे संधी आणि आव्हाने अशा संमिश्रपणे प्रत्ययास येतात.

## शोधनिबंधाची उद्दिष्टे :

१. यांत्रिकीकरण- संगणकीकरणाच्या प्रभावातून मराठी माणूस आणि मानव निर्मित मराठी साहित्य यांचे अनुबंध शोधणे.

२. मराठी साहित्य सृजनशीलतेला कृत्रिम बुद्धिमत्ता मारक आहे.

३. कथा, कविता, आत्मचरित्र, चरित्र इ. लेखनात भावना, कल्पना प्रतिभा यांच्या अभावातून कृत्रिम बुद्धिमत्ता योजने मराठी साहित्यावर दूरगामी परिणामकारक.

४. समकालीन मराठी साहित्यातील परिवर्तनशील घटकांना टाळणे अशक्य.

## शोधनिबंधाची गृहीतके :

१. कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी जीवनातील सर्व क्षेत्राना व्यापले आहे.

२. पर्यावरणातील संबंध घटकांना कृत्रिम बुद्धिमत्तेने गतिमानता प्राप्त झाली आहे.

३. साहित्य अभ्यास, लेखन, सृजन, आस्वाद, विश्लेषण व संपादन अशा बहुविध क्षेत्रांना कृत्रिम बुद्धिमत्ता प्रत्यक्ष -अप्रत्यक्ष स्पर्श करीत आहे.

४. साहित्य सृजनमधील चरित्र , आत्मचरित्र, काव्य , नाटक , ललित, विनोदी साहित्य इ. ना कृत्रिम बुद्धिमत्ता घातकी ठरत आहे.

**शोधनिबंधाची व्याप्ती व स्वरूप :**

१. मराठी साहित्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या मर्यादेत शोधनिबंध सदर करण्यात येत आहे.

२. यांत्रिकीकरण- संगणकीकरण यांच्या प्रभावातून मराठी माणूस आणि मानव निर्मित मराठी साहित्य यांचे अन्योन्य संबंध आहेत.

३. समकालीन मराठी साहित्यातील परिवर्तनशील घटकांना साहित्याचे अपरिहार्य अंग बनत आहेत.

४. बदलत्या वास्तवातील मराठी साहित्याचे रंग तरंग समजून घेणे.

**कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय ?**

‘कृत्रिम बुद्धिमत्ता ही कारणे शोधण्याची, अर्थ शोधण्याची, भूतकाळातून शिकण्याची आणि अनुभवाचे सामान्यीकरण करण्याची बौद्धिक प्रक्रिया आहे.’ शिकणे, समस्या सोडवणे, तर्क करणे आणि आकलन हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे वेगवेगळे घटक आहेत. ‘कृत्रिम वस्तूने दर्शविलेल्या बुद्धिमान वर्तनास कृत्रिम बुद्धिमत्ता’ (Artificial Intelligence, AI) असे म्हणतात. ही कृत्रिम वस्तू साधरणता संगणकच असते. कृत्रिम बुद्धिमत्ता हा विषय संगणक शास्त्रातील एक महत्त्वाची शाखा आहे. या शाखेमध्ये यंत्र शिक्षण (Machine Learning), त्यांचे बुद्धिमान वर्तन व परिस्थितीला जुळवून घेण्याची क्षमता आदींचा अभ्यास केला जातो. या शाखेतील संशोधन मुख्यत: स्वयंचलित कार्य करण्यासाठी आवश्यक असलेली बुद्धिमान वर्तणूक करतील अशा यंत्रांशी निगडित आहे. उदाहरणार्थ- नियोजन (Planning), संयोजन (Joining), निदान-विषयक प्रश्नांची उत्तरे शोधण्याची क्षमता, हस्ताक्षर, आवाज आणि चेहरा ओळखण्याची क्षमता इत्यादी. कृत्रिम बुद्धिमत्ता  म्हणजे मशीन किंवा संगणक प्रणालींना मानवी बुद्धिमत्तेसारखी कामे करण्याची क्षमता देणे, जसे की शिकणे, समस्या सोडवणे, भाषा समजणे आणि निर्णय घेणे, जेणेकरून ती मानवाप्रमाणे विचार करू शकतील आणि कार्य करू शकतील. यात डेटाचे विश्लेषण करणे, नमुने ओळखणे आणि अनुभवांवरून स्वतःला सुधारणे यासारख्या प्रक्रियांचा समावेश होतो.

कृत्रिम बुद्धिमत्तेची प्रमुख वैशिष्ट्ये :

शिकण्याची क्षमता: अनुभवातून शिकणे आणि नवीन माहितीशी जुळवून घेणे, जसे की- माणसांना येते.

तर्क करणे: दिलेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढणे आणि तर्कशुद्ध विचार करणे.

समस्या सोडवणे: किचकट समस्यांवर उपाय शोधणे आणि निर्णय घेणे.

भाषा समजणे: मानवी भाषा वाचणे, समजणे आणि प्रतिसाद देणे (उदा. व्हॉइस असिस्टंट).

प्रतिमा ओळखणे (Image Recognition): प्रतिमांमधील वस्तू आणि चेहेरे ओळखणे.

उदाहरणे : १. स्मार्टफोनमधील व्हॉइस असिस्टंट (Siri, Google Assistant). २. ऑनलाइन शॉपिंग वेबसाइट्सवरील शिफारसी (Recommendations). ३. चेहरा ओळखणारी प्रणाली (Facial Recognition).

थोडक्यात, AI हे संगणकांना मानवासारखे 'हुशार' बनवणारे तंत्रज्ञान आहे, जे अनेक किचकट आणि वेळखाऊ कामे स्वयंचलितपणे करू शकते. भारतात कृत्रिम बुद्धिमत्ता नियमन हे भगवद्गीतेतील श्लोकाचा आधार घेऊन केले जाते, म्हणून ते कार्य गैर संविधानिक आहे. भगवान श्रीकृष्णाच्या कुळात जन्म घेतलेला राजाला कृत्रिम बुद्धिमत्ता नियमनाचा अधिकार आहे. भारतात कृत्रिम बुद्धिमत्तेचे नियमन सार्वजनिक केले आहे.

**कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे साहित्यनिर्मितीला नवे आयाम प्राप्त झाले आहेत. :**

पूर्वकालीन साहित्यसृजन आणि लेखन  पूर्णता लेखकाच्या विचारक्षमतेवर अवलंबून असलेले दिसते. परंतु अलीकडील काळात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने लेखनप्रक्रिया अधिक सुलभपणे करण्याचे प्रयत्न झालेले आहेत. करण्यात येत आहेत. उदाहरणार्थ- कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने स्वयंचलित भाषांतर, वाक्यरचना सुधारणा, संदर्भ शोधण्याचे तंत्र आणि टंकलेखनाची सुविधा इ. बाबी मिळत आहेत. परिणामी लेखकाची सृजनशील उत्पादकता वाढत आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता  वापरून काव्य, कथा किंवा साहित्यलेखन करण्याचे प्रयोग सुरू झालेले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणाली साहित्यिकांना कल्पनांचा नवाप्रवाह देऊ शकते. काही ठिकाणी कृत्रिम

बुद्धिमत्तेला विशिष्ट शैलीतील मजकूर समाविष्ट करण्यास शिकवले जात आहे. त्यामुळे तेथे त्या धाटणीतील साहित्य निर्माण होऊ शकते. उदाहरणार्थ - "एखाद्या लेखकासारखी कादंबरी – कवीसारखे काव्य लिहा" असे निर्देश दिल्यास कृत्रिम बुद्धिमत्ता तशा धर्तीवर कादंबरी तथा कविता तयार करू शकते. यावरून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे शक्तिशाली साधन आहे, ज्याद्वारे माणसासारखीच क्षमता मशीन्स (यंत्रे) प्राप्त करू शकतील, करतील.

**कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे साहित्यातील आव्हाने -**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर हा साहित्यक्षेत्रात मानवाला त्रासदायकही ठरू शकतो. कारण त्याद्वारे यंत्रे कविता करू शकतील, इतर साहित्य प्रसवू शकतील. भाषांतर पण करू शकतील. मात्र, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या प्रभावामुळे काही मूलभूत प्रश्न उपस्थित होतात. साहित्य हा मानवी अनुभव आणि भावनांचा प्रवास असतो. कृत्रिम बुद्धिमत्तेला अद्याप मानवी भावना आणि प्रत्यक्ष अनुभव नसल्याने ते भावनिक खोली निर्माण करू शकत नाही. त्यामुळे त्याच्या निर्मितीत एखादी यांत्रिकता जाणवते. तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने साहित्यनिर्मिती करताना सर्जनशीलतेवर परिणाम होण्याची भीती आहे. जर लेखकांनी कृत्रिम बुद्धिमत्तेवर जास्त अवलंबून राहायला सुरुवात केली, तर मानवी कल्पनाशक्तीच्या मर्यादा पडतील.

**साहित्यनिर्मिती प्रक्रिया :**

साहित्य हा मानवी भावभावनांचा खेळ असतो. प्रतिभा ही वेडाची बहीण आहे. प्रज्ञा नवनवोन्मेशशालिनी असते. साहित्यनिर्मीतीला मानसिक आणि शारीरिक स्थिती स्थळ काळ परिस्थती परिणामकारक असते. विशिष्ट वाङ्मय प्रकार वैशिष्ट्यपूर्ण पार्श्वभूमीमध्ये साकार होत असतो. परंतु संगणकात जेवढी माहिती संचित असेल ते तेवढीच दर्शविते. पण सृजनशील साहित्यिक व्यक्तिपरत्वे , स्थळ, काळ, परिस्थिती सापेक्ष नित्यनूतन नावीन्यपूर्ण अविष्कार घडवत असतात.

उदा. - मराठी कथा आणि कविता लेखनात कल्पना , प्रतिभा, अभ्यास, व्यासंग , तांत्रिकता, साचेबद्धता आणि लेखनाची प्रेरणा हे घटक अतिशय महत्त्वाचे आहेत. रस, अलंकार, वृत्त सुयोग्य मेळ कवितेत जुळवावा आणि साधावा लागतो. तसेच प्रवासवर्णन लेखनासाठी प्रवासी आणि किमान दोन ठिकाणामधील प्रवास घडणे आवश्यक ठरते. प्रवासासाठी निवडलेले साधन महत्त्वाचे असते. मध्यवर्ती असते. तसेच यादृष्टीने कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून केलेले लेखन हास्यापद आहेच. त्यात वस्तुनिष्ठता जाणवेल.

आत्मचरित्र लिहिण्यासाठी, माणसाच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना आठवण्यासाठी जुनी छायाचित्रे, डायरी तपासतात. प्रामाणिकपणे आपल्या स्वतःच्या आतील आवाजात लिहावे लागते. मानवी स्मृतींना कथानकातून एक उद्देश देऊन कथन केले जाते. यासाठी एक रूपरेषा तयार करून कच्चा मसुदा बनवून संपादन करून इतरांच्या अभिप्रायातून सुधारित रूप द्यावे लागते. आणि पुनर्लेखन करावे लागते. ज्यामुळे वाचकांना आत्मकथनकाराच्या जीवनातील अनुभव समजण्यास मदत होते. परंतु कृत्रिम बुद्धिमत्तेला सर्वजन एखादा विषय विचारला तर उत्तर एकच येते. त्यात भाषा , कौशल्य, तांत्रिकता , वाचनीयता असेलच असे नाही . कोणीही, कधी कोठे आणि केव्हाही AI ला माहिती मागितली तर सगळीकडे सारखेपणा दिसेल. पण परंतु मानवी अविष्कार व्यक्तिपरत्वे भिन्न असतो. व्यक्तिपरत्वे सृजन लेखनाची आगळीक असेल. लेखनशैली वैशिष्ट्यपूर्ण असते. एकंदरीत आत्मचरित्र व गाव यांचा साचा भेटेल पण आत्मा नाही.

सृजन, जिज्ञासा आणि नावीन्य या त्रिसूत्रीवर माणूस अकल्पित प्रगती करत आहे. पुढेही करत राहील. मात्र गंभीर समस्या किंबहुना आव्हाने आपल्यासमोर उभे आहेत. मानवी बुद्धीने तयार केलेली एक अचंबित करणारी गोष्ट ‘कृत्रिम बुद्धिमत्ता’. आजपर्यंतच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा सर्वश्रेष्ठ बिंदू. अजूनतरी ‘कृत्रिम बुद्धिमत्ते’च्या बाबतीत आपण खूप सकारात्मक आहोत. त्यापासून स्पष्ट असा धोका संभवत नाही. पण धोका असणार नाहीच असे नाही. म्हणजेच कला ही साधनकेंद्री होऊन बसते. उदा.- एक लेखक चित्रपटासाठी पटकथा लिहितो. अनेक वर्षांच्या अभ्यासामुळे, अनुभवामुळे आणि भाषेवरील चिंतनामुळे उत्कृष्ट पटकथा लिहू शकतो. मात्र जर कृत्रिम बुद्धिमत्तेला योग्यप्रकारे 'सूचना' देऊन पटकथा लिहून घेतली तर ती पटकथा लेखकाची निर्मिती नसते. पटकथा अथवा साहित्यसृजनामध्ये लेखक ‘आत्मा’ ओतू शकेल. पण कृत्रिम बुद्धिमत्ता योजून ते कदापीही शक्य वाटत नाही. मानवीकरणाद्वारे मानवी भावना प्रतिबिंबित करणारा खरा आवाज साहित्यात उमटला पाहिजे. एआय लेखनाला मानवीकरण करण्याची एक शक्तिशाली पद्धत म्हणजे कथाकथन. मानवी स्पर्शाने संपादन केले पाहिजे. ते संभाषणात्मक बनवून लेखनाचा सूर मानवीकरणातून यावा. एखादा प्रस्ताव तयार करणे AI ला शक्य आहे. पण बिनचूक आदर्श कार्य अशक्य वाटते. तांत्रिकदृष्ट्या पर्याय म्हणून पाहता येते, परंतु सुलभ कार्य करण्यासाठी उपयुक्त नाही. मानवी भावनिकतेला साहित्यात गाभा देणे अशक्य

Copyright: © The authors. This article is open access and licensed under the terms of the Creative Commons Attribution License (http://creativecommons.org/licenses/by/4.0/)

वाटते.माता- पिता, मित्र- मैत्रीण, नातलग- स्नेहीजन यांच्याप्रति किंवा अंतःकरणातील भावभावना कृत्रिम बुद्धिमत्तेला कशा कळविणार ?

**कृत्रिम बुद्धिमत्ता आणि भाषेचे जतन**

कृत्रिम बुद्धिमत्ता हे साहित्याच्या जतनाचे प्रभावी साधन ठरू शकते. आजच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने जुन्या हस्तलिखितांचा डिजिटल संग्रह तयार केला जात आहे. मराठीतल्या अनेक दुर्मिळ ग्रंथांचे डिजिटायझेशन आणि त्यांचे OCR (Optical Character Recognition) तंत्रज्ञानाने रूपांतर करण्यात येत आहे. यामुळे जुनी पुस्तके वाचण्यायोग्य होत आहेत.कृत्रिम बुद्धिमत्ता च्या सहाय्याने भाषेतील नवे शब्द निर्माण होण्याची प्रक्रियाही सुरू आहे. भाषांतर तंत्रज्ञान अधिक प्रगत झाल्यामुळे जागतिक साहित्य मराठीत आणि मराठी साहित्य जगभर पोहोचण्याच्या संधी वाढल्या आहेत. कृत्रिम न्युरल नेटवर्क्सचे अनेक प्रकार आहेत. उदा. नैसर्गिक भाषा प्रक्रिया, वाक्यातील पुढील शब्दांचा अंदाज करणे, भाषांतर इ. या गोष्टी साहित्याशी संबंधित आहेत. दृष्टतमीकरण (ऑप्टिमायझेशन) म्हणजे कमीतकमी खर्चात वा वेळेत केव्हा, किती आणि कोणत्या प्रकारचे (साहित्याचे) घ्यावी हे ठरते. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने काही मॉडेल्स आणि सिम्युलेशन उपकरणे यामुळे दुर्घटनांचा सामना करण्यासाठी आधीच सजगता निर्माण करता येते.

**भविष्यातील संभाव्यता आणि लेखकांची भूमिका**

१. कृत्रिम बुद्धिमत्ता हे साधन आहे, पर्याय नाही. मराठी साहित्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग कसा करावा, हे लेखकांच्या हातात आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेला सहाय्यक म्हणून वापरणे उपयुक्त ठरेल, पण त्याच्या आधारे पूर्णपणे लेखन करणे हे साहित्याच्या मूळ गाभ्याला धक्का लावू शकते.

२. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माणूस यांचा समतोल साधला तर साहित्य अधिक समृद्ध होईल. कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करून लेखनाची गुणवत्ता सुधारता येईल, पण लेखकाची स्वतंत्र शैली आणि कल्पनाशक्ती जिवंत राहिली पाहिजे.

३. श्लील/अश्लील असे काही उरणारच, राहणारच नाही. देशातील सर्वात गरीब, वंचित व्यक्तीचे आयुष्य/ साहित्य खरे तर सुधारायला हवे, पण ते तसे होईलच याची शाश्वती नाही. कल्पकतेने आणि नावीन्याने अचंबित करणाऱ्या अगणित संकल्पना निसर्गात आढळतात. भविष्यात त्यांचा उपयोग साहित्यात कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारा झाला तर साहित्य अधिक समृद्ध होईल. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सकारात्मकतेने केला तर साहित्य गरुडभरारी घेणे शक्य.

४. CAMB.AI तुमच्या मजकुराचे प्रामाणिक आवाज, भावनिक सूर आणि प्रादेशिक बोलीभाषांसह सजीव मराठी भाषेत रूपांतर करते. कधीही न पाहिलेल्या प्रगत टेक्स्ट-टू-स्पीचचा अनुभव घ्या. जगातील सर्वात मोठ्या मनोरंजन, क्रीडा आणि सामग्रीद्वारे विश्वासार्ह आहे.

**निष्कर्ष**

१. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मराठी साहित्य यांचे नाते हे परस्परपूरक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता सर्जनशीलतेला पूरक ठरू शकते, पण त्याने मानवी संवेदनशीलता पूर्णतः बदलली जाऊ शकत नाही. त्यामुळे लेखकांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य तो उपयोग केल्यास साहित्याला अधिक प्रभावी बनवता येईल. कृत्रिम बुद्धिमत्ता हे शत्रू नाही, पण संपूर्णतः पर्यायही नाही.

२. युरोपीय महासंघाच्या कायद्यापासून प्रेरणा घेऊन भारतातही याबाबत काहीतरी सकारात्मक पावले उचलली जातील. एआयद्वारा संगणक, त्याद्वारा रोबोट, किंवा सॉफ्टवेअरला मानवी मेंदूसारखी बुद्धीने विचार करण्याची क्षमता प्राप्त होते. ती द्यावी का हा प्रश्न उरतोच. एआयचा वापर साहित्यात जपून, विचारपूर्वक, शहाणपणाने अन चातुर्याने करायला हवा. उदा. नैसर्गिक भाषा प्रक्रिया, वाक्यातील पुढील शब्दांचा अंदाज करणे, भाषांतर इ. या गोष्टी साहित्याशी संबंधित आहेत.

३. कार्यालयीन कामकाजात प्रभावी व परिणामकारक उपयोग होत आहे, हे मान्य. परंतु सृजनशील मराठी साहित्यात भावना – कल्पना – विचार यांचा सुमेळ घालणे कृत्रिम बुद्धिमत्तेला शक्य नाही. यादृष्टीने मराठी साहित्य लेखनात कृत्रिम बुद्धिमत्ता निव्वळ टाकाऊ नसली तरी प्रभावी साहित्य त्यातून होऊच शकत नाही, असे माझे ठाम मत आहे.

४. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे आपली सर्जनशीलता धोक्यात येईल. भारतासारख्या देशात जिथे संशोधन आणि विकासाकडे मुळातच फालतूचा खर्च म्हणून पाहिले जाते, तिथे हा धोका जास्तच आहे.

५. एकूणच ती कला नाही. कलेमध्ये आत्म्याची अभिव्यक्ती असायला हवी. मानवी सृजन म्हणजे अभिव्यक्ती असते. मानवी निर्मितीत अनाहताची, लौकिकतेच्या सीमा ओलांडण्याची जादुगिरी असते. सर्व कलाकार, ते लेखक असो, चित्रकार, संगीतकार, कवी, छायाचित्रकार, नट, नर्तक किंवा आणखी कुठलाही कलाकार; त्याचे

वेगळेपण हेच की त्याचे सृजन हे इतरांपेक्षा भिन्न असते, ते 'प्रेरक' असते...नवकल्पना आहे. नव्या युगाची नांदी ठरते. साहित्यकलेला रसिकांचीनव्याने परिभाषित करण्याची गरज असते..

६. बुद्धिमत्ता आणि जाणिवा यांचा मेळ लगेच बसत नाही. पण या मार्गावर पुढे केव्हातरी संगम झालाच तर मानवजात धोक्यात येऊ शकेल. बारकावे समजून घेण्यासाठी, विश्लेषणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रचंड फायदेशीर ठरेल.

**समारोप :**

शास्त्रज्ञ असा दावा करतात की, २०५३ नंतर शल्यचिकित्सकांची गरजच कमी होईल. २०९५ नंतर यंत्रमानव करू शकणार नाहीत असे कोणतेही मानवी काम राहणार नाही. (अर्थातच पुनरुत्पादन सोडून). कृत्रिम बुद्धिमत्तेत मात्र आपली बुद्धिमत्ता/जीजिविषा हळूहळू उत्क्रांत न होता झपाट्याने आणि अतिशय वेगाने विकसित केली जात आहे. कदाचित नैसर्गिक उत्क्रांतीचाच पुढचा टप्पा हा असावा. टेस्लाचे ॲलॉन मस्क यांच्यासह अनेक जाणकारांनी यावर एक खुले पत्र लिहिले आहे. यामध्ये एआय तंत्रज्ञानाच्या पुढील पिढीचा विकास थांबविण्याची विनंती करण्यात आली आहे. पत्रात काही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

जसे, "पुढे जाऊन मानवी मेंदूची जागा घेईल अशा कृत्रिम बुद्धिमत्तेची आपण निर्मिती करायलाच हवी आहे का?" या जाणकारांचे असे म्हणणे आहे की आण्विक उर्जेप्रमाणे कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रही नियंत्रित असायला हवे. असो, यापुढील काळ हा रोमहर्षक आणि तंत्रज्ञानाधारित राहणार आहे. येणाऱ्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्र टाळून जगणे निव्वळ अशक्य आहे. युरोपीय महासंघाच्या कायद्यापासून प्रेरणा घेऊन भारतातही याबाबत काहीतरी सकारात्मक पावले उचलली जातील. एआयद्वारा संगणक, त्याद्वारा रोबोट, किंवा सॉफ्टवेअरला मानवी मेंदूसारखी बुद्धीने विचार करण्याची क्षमता प्राप्त होते. ती द्यावी का हा प्रश्न उरतोच. एआयचा वापर साहित्यात जपून, विचारपूर्वक, शहाणपणाने अन चातुर्याने करायला हवा. प्रतिभा , कल्पना, व्यासंग, अभ्यास यांच्यासह कृत्रिम बुद्धिमत्तेचा आधार घेऊन स्फूर्तीच्या झटक्यासह साहित्य निर्मिती साधावी.

**संदर्भग्रंथ** : मराठी भाषा आणि संगणक – अशोक कुलकर्णी, सत्यम प्रकाशन , मुंबई.

मराठी संगणक प्रक्रिया : भाषा आणि साधने – म. ग. देशमुख , विद्यापीठ प्रकाशन , नागपूर.

कृत्रिम बुध्दीमत्ता : संकल्पना आणि उपयोग - डॉ. अनिल जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे.

माहिती तंत्रज्ञान आणि मराठी भाषा – डॉ. माधवी देशपांडे, सुबोध प्र काशन , पुणे.

नियतकालिके : १. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि साहित्य क्षेत्र – मनोहर जोगळेकर, (मार्मिक, February 7, 2025)

२. एआय - डॉ दीपक म्हात्रे ( दैनिक महाराष्ट्र टाईम्स, ३१ ऑगस्ट २०२३)

३. जीवनशैली, तंत्रज्ञान - राहुल खरे, (जुलै, 1, 2023)

४. कृत्रिम बुध्दीमत्तेचा (AI) मराठी सात्रित्य क्षेत्रातील अनुप्रयोग- डॉ. गोपीनाथ पांडूरांग बोडखे, ((Journal of Research and Development (ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(VII)| September-2025)

Copyright: © The authors. This article is open access and licensed under the terms of the Creative Commons Attribution License (http://creativecommons.org/licenses/by/4.0/)